# लीलावती रुग्णालय आयोजित हृदयरोग तपासणी शिबिराला उत्स्फूर्त प्रतिसाद

मुंबई : युज हार्ट फॅार अॅक्शन या संकल्पनेतंर्गत लीलावती हॉस्पिटलने मेनाबेन हेल्पिंग हँड्सच्या माध्यमातून गरजू रुग्णांसाठी मोफत हृदय तपासणी शिबिराचे आयोजन केले होते. या उपक्रमातंर्गत हृदयाचे आरोग्य चांगले कसे राखता येईल तसेच हृदय व रक्तवाहिन्यासंबंधी आरोग्याची काळजी कशी घ्यावी, याविषयी जनजागृतीकरिता करण्यात आली. या शिबीरात ३०० हून अधिक रूग्णांची तपासणी करण्यात आली. या शिबीरातंर्गत उपस्थितांना कोलेस्ट्रॉल तपासणी, एलडीएल, इलेक्ट्रोकार्डियोग्राम, ट्रायग्लिसरायड्स, रँडम ब्लड शुगर, रक्तदाब चाचणी आणि हृदयरोग तज्ञांचे मार्गदर्शन यासह विविध स्क्रीनिंग चाचण्या करण्यात आल्या. लहान मुलेदेखील शिबिरात सहभागी झाली होती. त्यापैकी एका मुलीला जन्मजात हृदयविकाराचे निदान झाले होते. तिची पुढे तपासणी करुन लीलावती रुग्णालयात मोफत शस्त्रक्रिया होणार आहे. सहभागी रुग्णांपैकी काही रुग्णांना तणावासंबंधी चाचणी, अँजिओग्राफी, अँजिओप्लास्टी किंवा सीएबीजीची आवश्यकता भासू शकते, अशा रुग्णांना आवश्यक औषधेही लीलावती हॉस्पिटलमार्फत विनामूल्य दिली जाणार आहेत.